# University of Mumbai

परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८

क्र.परीक्षा/निकाल कक्ष/१८३६/२०१७

**परिपत्रक :—**

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, संलग्नीत/संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात/संस्थेत या शैक्षणिक वर्षामध्ये (शै.व.२०१६—१७) पदवीच्या दुसऱ्या वर्षाला शिक्षण घेत असलेल्या ज्या विद्यार्थ्यांची संबंधीत शिक्षणक्रमासाठी Eligibility Confirmation होऊन PRN प्राप्त अद्याप नाहीत; अशा विद्यार्थ्यांची संबंधीत शिक्षणक्रमासाठीची Eligibility Confirmation करून PRN शैक्षणिक वर्ष २०१७—१८ प्रारंभ होण्यापूर्वी (जुन, २०१७ पूर्वी) प्राप्त करून घेण्यात यावेत; जेणेकरून हे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०१७—१८ मध्ये संबंधीत शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्षाला प्रविष्ठ झाल्यानंतर त्यांच्या या शिक्षणक्रमासाठीच्या सत्र—५ च्या परीक्षेसाठीचे आवेदन पत्र भरणे सुलभ होईल.

पुढे असे की, विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदन पत्र त्यांचे Eligibility Confirmation होऊन PRN प्राप्त नसल्यामुळे भरता न आल्यास तसेच याबाबत पुढे काही बाब उद्‌भवल्यास यास संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहील.

उपरोक्त बाबींची सर्व संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. : ०९ जानेवारी, २०१७.

अ. प्रत:—

१. मुंबई विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित असलेल्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थेचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक तसेच विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेंद्राचे संचालक/समन्वयक

ब. प्रत माहितीस्तव अग्रेषित:—

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.

क. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:—

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. उपकुलसचिव, पात्रता व नोंदणी विभाग
३. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग
४. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

ड. प्रत माहितीसाठी अग्रेषित:—

१. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
२. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
३. मा. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांचे स्विय सहायक
४. कुलसचिव यांचे स्विय सहायक
५. परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक